# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.२९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०४/२०१७

**१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंदः–**

दिनांक २५/०४/०१७ चे १४.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले हर्बल प्रोडक्ट बाबत माहीती देण्याकरीता गेली असता यातील आरोपीने डॉक्टर मुलगी राधीका घरी असल्याचे सांगुन सदर प्रोडक्ट बाबत माहीती दया. मी डॉ. राधीकाला सांगतो असे म्हणून घरात बोलवुन फिर्यादी ही हर्बल प्रोडक्ट बाबत माहीती देत असतांना आरोपीने फिर्यादीचे हात पकडुन तिचे इच्छेविना विनयभंग केल्याने फिर्यादी वय ३० वर्ष हीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम ३५४, (अ) (१) (२) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि मोरे पो स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन जागेच्या वादावरून हातामध्ये काठया व दगड घेवुन मारहाण करून गंभीर व साधी दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०४/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी फिर्यादी सोबत जागेच्या वादावरून गैर कायदयाची मंडळी जमवुन हातामध्ये काठया व दगड घेवुन फिर्यादीला व फिर्यादीचे नातेवाईक यशवंत मोहतुरे, राधेशाम मोहतुरे, दामोधर मोहतुरे, सौ. तारा मोहतुरे व इतर आणी स्त्रीयांना मारहान करून साधी व गंभीर दुखापत केल्याने फिर्यादी दामोधर शंकर मोहतुरे वय ५२ वर्ष रा निलज खुर्द यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम १४३, १४४, १४७, १४८, १४९, ३२३, ३२४, ३२५ भादंवि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि ढोबळे पो. स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) गैरकायदयाची मंडळी जमवुन जागेच्या वादावरून हातामध्ये काठया व दगड घेवुन मारहाण करून साधी दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०४/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी फिर्यादी सोबत जागेच्या वादावरून गैर कायदयाची मंडळी जमवुन हातामध्ये काठया व दगड घेवुन फिर्यादीला व फिर्यादीचे नातेवाईकांना व त्यांच्या स्त्रीयांना मारहाण करून साधी दुखापत केल्याने फिर्यादी दिपक बाबुराव आगासे वय ४४ वर्ष रा निलज खुर्द यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम १४३, १४४, १४७, १४८, १४९, ३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि ढोबळे पो. स्टे. करडी हे करीत आहेत.

**४) गैरकायदयाची मंडळी जमवुन कुंपनाच्या वादावरून मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०४/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे कुंपनाच्या वादावरून पो स्टे. ला रिपोर्ट का दिली म्हणून फिर्यादीचे घरात जावुन फिर्यादीला मारहान करून माहाऱ्या, धेडया अशी जातीवाचक शिवीगाळ करून गैरकायदयाची मंडळी जमवुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी विजय अंबाजी खोब्रागडे वय ४१ वर्ष रा मांगली चौ. यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १४३, ४५२, ३२३, ५०४, ५०६, भादवि सहकलम ३ (१)(आर)(एफ), ३ (२)(५)(अ)अ.जा.ज.अ.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास श्री संख्ये उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली कॅम्प पवनी हे करीत आहेत.

**५) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपनामुळे पायी जाणाऱ्या एका ईसमास धडक मारून जखमी केल्याने व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०४/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील जखमी किरण विस्वनाथ कांबळे रा. बेटाळा व ईतर अनोळखी मुले हे पायी श्री प्रभु पेट्रोलपंप जवळुन जात असतांना यातील आरोपी चालकाने आपले मो.सा. ने डब्बलसिट बेटाळा वरून पवनी कडे जात असतांना ताब्यातील वाहन हयगयीने भरधाव वेगाने चालवुन किरण कांबळे यास धडक मारून जखमी केले व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रामेश्वर तुकारम मोठघरे वय ७३ वर्ष रा. बेटाळा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**६) पिकअप बोलेरो चालकाच्या निष्काळजीपनामुळे मोटार सायकल चालकाला धडक मारून दोन ईसम जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०४/२०१७ चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा जावई जखमी भास्करराव सोनटक्के हा आपल्या मोटार सायकल क्र.एमएच. ४९ /१३७० ने प्रभाकर सतीबावने यांचे सोबत सरांडी लाखांदुर येथे लग्ना करिता जात असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल ला समोरून धडक मारल्याने जखमी भास्कर व त्याचे मागे बसलेला प्रभाकर सतीबावने याच्या उजव्या पायाला मार लागल्याने घोटया जवळील हड्डी फॅक्चर करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी प्रकाश पांडुरग मेश्राम वय ४६ वर्ष रा. वाटोडा लेआऊट रोड सरोदे नगर नागपुर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अड्डयावर / जुगारावर धाडी . :–**

दिनांक २५/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे जवाहरनगर,मोहाडी,कारधा,तुमसर,करडी, वरठी,सिहोरा,गोबरवाही,साकोली,पालांदुर,पवनी,अडयाळ येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण २४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २१४ लिटर हा.भ.दारू + ४०५ के.जी. सडवा मोहा साहीत्य किंमती ३९,३७०/–रु, ५० लिटर ५८० मीलीलीटर देशी/विदेशी दारू किंमती २७,७४५/रू. तसेच जुगातुन किंमती १,४२,१६९/रू. माल असा एकुण किंमती २,०९,२८४/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.